सकाळ | नाशिक शहर
नाशिक, रविवार, १२ जानेवारी
f SakalNews | @esakalupdate | www.esakal.com
Call Center : 92

# TODAY



महात्मानगर : नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे शनिवारी झालेल्या 'नाशिक रन'निमित्त येथील मैदानावर जमलेले नागरिक. (छायाचित्र : सोमनाथ कोकरे)

Scanned by CamScanner

महात्मानगर : नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे शनिवारी झालेल्या 'नाशिक रन'निमित्त येथील मैदानावर जमलेले नागरिक

# कडाक्याच्या थंडीत धावले नाशिककर

## नाशिक रनमध्ये विविध वयोगटांतील धावपटूंचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

**नाशिक, ता. ११ : वातावरणात गारवा असतानाही ऊर्जा, उत्साहात धावत नाशिककरांनी सुदृढ आरोग्याचा संदेश दिला. 'रन फॉर फन'चा संदेश देताना सामाजिक कामात योगदानही नाशिककर धावपटूंनी नोंदविले. रविवारी (ता.११) महात्मानगर परिसरात झालेल्या 'नाशिक रन' उपक्रमात लकी ड्रॉद्वारे क्रीडाप्रेमींना भेटवस्तू प्रदान केल्या. यंदा प्रथमच झालेल्या दहा किलोमीटरच्या मॅरेथॉन स्पर्धेत धावपटूंनी सहभाग घेतला.**

उपक्रमाप्रसंगी बॉश इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सौमित्र भट्टाचार्य, टीडीके इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक एन. बालकृष्णन, महापौर सतीश कुलकर्णी, 'नाशिक रन'चे अध्यक्ष एच. एस. बॅनर्जी, उपाध्यक्ष रमेश जी. आर. सचिव अनिल दैठणकार, खजिनदार राजाराम कासार, विश्वस्त प्रबल रे, श्री. अनंतरामन, अशोक पाटील, श्रीकांत चव्हाण आदी उपस्थित होते.

सकाळी साडेसहाच्या सुमारास नाशिक रन मॅरेथॉनला सुरवात झाली. पोलिस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील, महापालिका सभागृहनेते सतीश सोनवणे यांच्यासह अडीचशे धावपटूंनी मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदविला. स्पर्धेचे मुख्य समन्वयक विजय काकड होते. रेस ॲम्बेसिडर रॅम स्पर्धा पूर्ण करणारे डॉ. महेंद्र महाजन, डॉ. हितेंद्र महाजन, अल्ट्रा रनर अनिरुद्ध अथणी, नारायण वाघ, आयर्नमॅन महेंद्र छोरिया, प्रशांत डबरी, डॉ. अरुण गचाले, किशोर घुमरे, मॅरेथॉन धावपटू अश्विनी देवरे, सायकलपटू डॉ. मनीषा रौंदळ आदींनी मॅरेथॉन स्पर्धा पूर्ण केली. नाशिक रन ज्योत नामवंत क्रीडापटूंच्या हस्ते प्रज्वलित केली. तोलाणी डान्स इन्स्टिट्यूटतर्फे नृत्य सादरीकरण झाले. यानंतर विशेष मुलांसाठी 'रन'चा तसेच प्रौढांसाठी रनचा प्रारंभ झाला. महात्मानगर क्रीडांगणापासून पारिजातनगर, रॅकेट सर्कल, जेहान सर्कल, स्वामी समर्थ चौक, नंदन स्वीट्सपासून पुन्हा रॅकेट सर्कल, पारिजातनगर व पुन्हा महात्मानगर क्रीडांगण येथे रनचा समारोप झाला.

### लकी ड्रॉद्वारे बक्षिसांचा वर्षाव

सहभागींपैकी लकी ड्रॉद्वारे बक्षिसांचे वितरण करण्यात आले. यात जियाजी ऑटोमॅशनतर्फे प्रथम विजेत्यास ई-बाइक, द्वितीय विजेत्यास गिअर बाइक, तृतीय पारितोषिक एलसीडी टीव्ही होता. चौथ्या क्रमांकाचे दोन बक्षीस हॉटेल आईवीआईएसतर्फे पुण्यात दोन दिवस दांपत्यांसाठी निवास, पाचव्या क्रमांकाचे स्टील फर्निचर प्रायोजित केले होते. सहाव्या क्रमांकाचे गोविंदास एच. आर. सर्व्हिसेसतर्फे मोबाईल, सातव्या क्रमांकाचे मिनिटेक सिस्टिमतर्फे एचपी लॅपटॉप ट्रॉली बॅग अशा विविध वस्तूंचा वर्षाव करण्यात आला.

### मॅरेथॉनमधील गटनिहाय विजेते असे

**(अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय)**

**महिला :** १५ ते ३५ वयोगट- योगिता वाघ, दिशा बोरसे, निवृत्ता धवड,
- ३६ ते ५० वयोगट - अश्विनी देवरे, नितू सिंग, नीता नारंग,
- ५१ वर्षांपुढील गट - सुचिता पालवे, कल्पना कुशारे, रेवती चिटको.

**पुरुष :** १५ ते ३५ वयोगट- रोहित यादव, सुनीत कुमार, रविकुमार,
- ३६ ते ५० वयोगट- सावळीराम शिंदे, संतोष वाघ, नंदू उगले,
- ५१ वर्षांपुढील गट : हरीश चंद्र, वसंतराव कचरू, दिनकर शेळके



Scanned by CamScanner